# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र.७०५ /२०२६

**विषय : सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये विभागनिहाय देण्यात आलेल्या राष्ट्रीय सेमिनार व आंतरराष्ट्रीय सेमिनार तरतुदीच्या मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख/संचालक यांना कळविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२६-२०२७ पासून शैक्षणिक विभागांना त्यांच्या मागणीनुसार राष्ट्रीय सेमिनार २ लाख व आंतरराष्ट्रीय सेमिनार ३ लाख यापैकी एका सेमिनारसाठी तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वित्त व लेखा विभागांतर्गत ठेवण्यात आलेली आहे. यामध्ये विभागनिहाय मंजूर सेमिनार तरतूद पाहता येईल.

सेमिनारसाठी एकूण होणाऱ्या खर्चापैकी कमाल ७० टक्के अनुदान विद्यापीठाचे राहिल (संबंधित विभागाला मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीच्या अधिन राहून) व उर्वरित पूर्ण ३० टक्के रक्कम विभागाने नोंदणी शुल्क, प्रायोजक शुल्क इत्यादीव्दारे जमा केलेल्या रक्कमेतून खर्च करणे बंधनकारक राहिल. कृपया याची नोंद घ्यावी, यास अनुसरून योग्य कार्यवाही करावी.

(सीएमए (डॉ.)चारूशीला गायके)
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा.क्र.वित्त/अर्थसंकल्प/२०२६-२७/ ४२४
दिनांक : १७ जून, २०२६

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१) मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग
२) मा. संचालक, सर्व प्रशाला
३) सर्व वित्त शाखा प्रमुख

यांना विनंती की, सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.